# शहराची कारभारीण


नगरसेविका व राजकारणात स्वतःचे स्थान निर्माण करू पाहणाऱ्या महिलांसाठी...

अंक चवथा, क्रमांक-४, मे २०१३ (खाजगी वितरणासाठी)

मी एखाद्या
समाजाचा विकास हा
त्या समाजातील स्त्रियांच्या
प्रगतीच्या प्रमाणात मोजतो

डॉ. बाबासाहेब आंबेडकर

टाटा सामाजिक विज्ञान संस्था
अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था
महाराष्ट्र महिला परिषद



॥ कारभारणींचा नवा दागिना, ताठ मान-ताठ कणा ॥

# मानपत्र

आज आम्ही,

माननीय **श्रीमती अलका शिवाजी फुलपगार**

राहाणार **जुन्नर** यांना नगरसेविका म्हणून हे मानपत्र सन्मानाने देत आहोत.

लोकप्रतिनिधी या नात्याने आपण लोकहिताचे राजकारण मनापासून करीत आहात. महिलांसह गरीबाला सन्मानाने जगता यावं, हे ध्येय तुम्ही समोर ठेवले आहे. विरोधकांसह सर्व मतदारांशी तुम्ही जिव्हाळयाचा व्यवहार ठेवण्याचा मनापासून प्रयत्न करीत आहात.

धर्म, जात, लिंग, भाषा, वर्ग हे भेद मतदारांसाठी काम करत असताना आड येत नाहीत. समतेचे उद्दीष्ट ठेवून तुम्ही सामाजिक कार्य करीत आहात.

इतकेचं नव्हे तर मतदारसंघाला योग्य न्याय मिळावा, म्हणुन तुम्ही स्वतःच्या कारभार क्षमता वाढविण्याचा सातत्याने प्रयत्न करीत आहात.

छोटे-माठे यश व अपयश पचवत तुम्ही विकासाचा नवा पत्ता - अर्ध्या महिला अर्धी सत्ता ही घोषणा आपण सार्थ ठरवाल अशी अपेक्षा आहे. स्थानिक लोकशाहीवर तुमचा विश्वास असून ती बळकट करण्यासाठी तुमचे प्रयत्न सुरू राहतील, असा विश्वास वाटतो.

तुमच्या या निःस्वार्थी योगदानाकरीता हे मानपत्र देताना आम्हाला आनंद होत आहे. तुमच्या या कष्टपूर्वक व सातत्याने टिकून राहण्याच्या या प्रयासाला आमचा निरंतर पाठिंबा व शुभेच्छा !

महाराष्ट्र महिला परिषद

अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था

टाटा समाज विज्ञान संस्था

दिनांकः **मे २०१३** स्थळः **मुंबई**

## 'सन्मान कारभारणीचा'

# श्रीमती अलका फुलपगार यांचा परिचय

श्रीमती अलका फुलपगार या जुन्नर शहराच्या निवासी आहेत. एका मागसवर्गीय घरामधील सामान्य बाई. आपली आई जुन्नर नगरपालिकेमध्ये सफाई कामगार म्हणून काम करत होत्या. वडील मुंबईमध्ये रेल्वेमध्ये नोकरी करत होते. आपण एकूण पाच भावंडे. घरामध्ये जेमतेम परिस्थिती होती. आपण या परिस्थितीमध्ये ११ वी पर्यंत शिक्षण पूर्ण केले. वयाच्या १७ व्या वर्षी १९७६ मध्ये जुन्नरमध्ये स्थायिक श्री. शिवाजी फुलपगार यांच्याबरोबर आपले लग्न झाले. लग्नानंतर चूल व मूल यामध्ये आपण बंदिस्त झालात; पण मुळातच आपल्याला सामाजिक कामाची आवड असल्यामुळे घराबाहेर पडून काहीतरी करावे असे आपल्याला वाटत होते. याच काळात शासनाने प्रौढ शिक्षण योजना राबविली होती. जुन्नर मधील छत्रपती कॉलेजच्या माध्यमातून प्रौढांना शिकवण्यासाठी सेविका म्हणून आपली नेमणूक झाली. आपले सासरे सेवा निवृत्त झाल्यानंतर सरकारमान्य स्वस्त धान्याचे दुकान चालवत होते. गर्दीच्यावेळी आपण मदत म्हणून सासऱ्यांसोबत दुकानावर बसू लागलात. सासऱ्यांचे निधन झाल्यानंतर दुकानाची जबाबदारी आपण स्वतः घेतली. कामाची सगळी माहिती आत्मसात केली. खऱ्या अर्थाने बाहेरच्या जगाची आपल्याला हळुहळू माहिती होवू लागली.

नगरपालिका, ग्रामपंचायत, पंचायत समिती मध्ये महिलांसाठी ३३% आरक्षण आले. १९९६ साली आपण जिथे रहात होता तो वॉर्ड महिलांसाठी खुला वॉर्ड म्हणून आरक्षित झाला. आपण मागासवर्गीय असल्यामुळे खुल्या वर्गातून आपल्याला निवडून देतील का ही शंका मनात होती. पण दुकान चालवत असताना लोकांशी कसे बोलायचे, त्यांचे प्रश्न काय आहेत याची उमज आपल्याला आली होती. या अनुभवाच्या आधारावर आपण हिंमत केली आणि १९९६ च्या नगरपालिकेच्या निवडणुकीला आपण उभ्या राहिल्यात. विरोधकांनी जातीवाचक प्रचार सहन करत ही निवडणूक आपण जिंकलात. इथून आपला राजकीय प्रवास सुरू झाला. नगरपालिकेत निवडून गेल्यानंतर खर तर नगरपालिका कामकाज काय आहे हे कळत नव्हते. त्यातच चार-पाच महिने निघून गेले. हळुहळू नगरपालिकेचे कामकाज कळायला लागले व कामांना सुरूवात केली. आई सफाई कामगार असल्यामुळे सफाई कामगरांचे प्रश्न आपल्याला माहित होते. त्या प्रश्नांपासून आपण सुरूवात केली. १३ वर्ष सफाई कामगारांच्या वारसांना नोकऱ्या दिल्या गेल्या नव्हत्या. तो प्रश्न आपण हातात घेतला. त्यासाठी सर्व ती धावपळ करत तब्बल १० वारसदारांना नगरपालिकेत नोकरी देऊन आपण दहा कुटुंबाच्या पोटा पाण्याचा प्रश्न सोडवलात.

नगरपालिकेमध्ये बरेच दिवस मुख्याधिकारी नव्हते. तहसीलदारच नगरपालिकेचा कारभार पाहत होते. तालुक्याचे काम पाहत असताना नगरपालिकेकडे दुर्लक्ष व्हायचे आणि मग आपोआपच विकास कामांना खीळ बसायची. तुम्ही स्वतः उपोषण करून नगरपालिकेत मुख्याधिकारी यांची नेमणूक करवून घेतली. खरतर ही सर्व कामे करीत असताना स्त्री म्हणून खूप मर्यादा पडायच्या पुरूष प्रधान संस्कृती असल्यामुळे नगराध्यक्ष होण्याची क्षमता असताना ही आपण नगराध्यक्ष होवू शकला नाहीत. ही खंत कायम आपल्याला आहे. स्त्री कुठल्याही क्षेत्रात निवडून गेल्यानंतर तिथला कारभार हे त्यांचे नवरे चालवित असतात. पण आपल्या पतीने मात्र कधीही आपल्या राजकीय कामात ढवळाढवळ न करता, पूर्ण स्वातंत्र दिले आणि म्हणून आपण हे सगळे करू शकला आहात.

पुन्हा २००६ मध्ये आपला वॉर्ड महिलांसाठी खुला वॉर्ड म्हणून आरक्षित झाला. यावेळी आपण निवडणुक लढविली. आपल्या कामांमुळे राष्ट्रवादी पक्षाचे आमदार मा. वल्लभशेठ बेनके साहेब यांनी आपल्याला तिकिट दिले. आपल्या पाठीशी भरभक्कम अनुभव होता. निवडून आल्यापासूनच आपण कामाचा सपाटा लावलात. वस्ती सुधारणा अंतर्गत मिळालेल्या निधीचा पुरेपूर उपयोग करून आपण दलित वस्तीसाठी स्पेशल पाण्यासाठी पाईपलाईन टाकली. दलित वस्तीचा पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी सोडवला. त्याचप्रमाणे संपूर्ण दलित वस्तीमध्ये सोलर दिवे बसवून दलित वस्त्या उजळून टाकल्यात. समाजमंदिर आणि बुध्दविहारचे संपूर्ण सुशोभिकरण केले. संपूर्ण वॉर्डमधील रस्त्यांचे डांबरीकरण केले. संपूर्ण वॉर्डचा कायापालट केला. विकास कामांबरोबर महिलांसाठी नगरपालिकेमध्ये बरेच उपक्रम राबविले. आपण चार वर्ष महिला व बाल कल्याण समितीच्या सभापती राहिलात. सभापती असताना नगरपालिकेच्या माध्यामातून अनेक बचतगटांची स्थापना केली. त्या बचत गटांतील महिलांसाठी अनेक कार्यक्रम घेतले. त्यामध्ये प्रामुख्याने स्वयंरोजगारासाठी प्रशिक्षण घेतले. महिला आर्थिकदृष्ट्या सक्षम असेल तर आपोआपच तिला घरामध्ये मानाचे स्थान निर्माण होते हे आपण जाणून होतो म्हणून स्वयंरोजगार प्रशिक्षणावर भर दिला. प्रशिक्षण घेऊन अनेक महिला स्वतःच्या पायावर उभ्या राहिल्या आहेत.

घरातील महिला जर शारिरीक दृष्ट्या सुदृढ असेल तर संपूर्ण घर आनंदी असते, आणि म्हणून महिलांसाठी आपण आरोग्य शिबिरे घेतली. कायदेशीर सल्ला मिळवून देण्यासाठी महिलांसाठी विशेष कार्यक्रम घेतले.

अशा अनेक प्रकारचे कामे करीत असताना नगरपालिकेमध्ये जकात, वीज, पाणी आणि महिला व बालकल्याण समिती या अनेक विषयांवर काम केले.

हे सगळे करीत असताना स्वतःच्या कुटुंबाकडे कधीच दुर्लक्ष केले नाही. आपल्या वाटचालीत आई, बारसाबाई, सासरे, महादेवराव व बहिण कुसूम बाळसराफ यांचा महत्वाचा वाटा आहे.

**डॉ. जतीन मोदी**
अध्यक्ष, अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, मुंबई

**संपादक**

**रणजित चव्हाण**
महासंचालक, अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, मुंबई

**संपादकीय मंडळ**

**डॉ. (प्रा.) स्नेहा पळणीटकर**
संचालिका, अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, मुंबई

**डॉ. (प्रा.) अमिता भिडे**
स्कूल ऑफ हॅबिटाट स्टडीज, मुंबई
टाटा सामाजिक विज्ञान संस्था

**स्मिता वायंगणकर**
स्कूल ऑफ हॅबिटाट स्टडीज, मुंबई
टाटा सामाजिक विज्ञान संस्था

**भारती शर्मा**
महाराष्ट्र महिला परिषद

**नीला लिमये**
महाराष्ट्र महिला परिषद

**भीम रासकर**
महिला राजसत्ता आंदोलन

**सीमा काकडे**
प्रयास, पुणे

**संपादक / प्रकाशक**
अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, मुंबई
टाटा सामाजिक विज्ञान संस्था,
स्कूल ऑफ हॅबिटाट स्टडीज, मुंबई
महाराष्ट्र महिला परिषद, मुंबई

**संपर्क**

**डॉ. (प्रा.) स्नेहा पळणीटकर**
अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, मुंबई
एम.एन.रॉय मानव संसाधन संकूल प्लॉट नं. ६,
एफ ब्लॉक, शासकीय वसाहती समोर,
इमारत क्र. ३२६, समोर, बांद्रा (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१.
दूरध्वनी क्र. : ०२२-२६५७३७९५ / ९६
फॅक्स : २६५७ ३९७३

**टाटा सामाजिक विज्ञान संस्था**
**स्मिता वायंगणकर**
स्कूल ऑफ हॅबिटाट स्टडीज
व्ही. एन. पुरव मार्ग, देवनार,
मुंबई - ४०० ०८८.
दूरध्वनी क्र.: ०२२-२५५२५३७५ / ७६

**महाराष्ट्र महिला परिषद**
**भारती शर्मा**
श्रमिक, रूम नं. ९३२/९३३/५५१
डी मार्ट च्या मागे, राजपाल हॉस्पिटल समोर,
सेक्टर - ७, कोपरखैराणे, नवी मुंबई -
४००७०९
दूरध्वनी क्र.: ०२२-२७५४४२१९ /
२७५४८२१२

**मुखपृष्ठ**
श्री. मुकुंद सावंत, टाटा सामाजिक विज्ञान संस्था

**अंक जुळणी व मुद्रण**
एन.एस.डी. आर्ट, अंधेरी, मुंबई
२८३९३४५० / ५१

***नोंद* : सदर अंकातील लेख हे लेखकांची वैयक्तिक मते आहेत. संपादक / संपादक मंडळ / प्रकाशक आणि संबंधित तीनही संस्था लेखात दिलेल्या मतांशी सहमत असतीलच असे नाही याची नोंद घ्यावी.**

## 'संपादकीय'

# 'जेंडर बजेट' - महिला व बाल कल्याण समितीच्या आग्रहांपैकी एक आग्रह !

भारतीय संविधानाने दिलेले मूलभूत हक्क आणि अधिकार हा स्त्रियांच्या विकासाचा पाया आहे. त्याचप्रमाणे स्त्रिया आणि समाजातील दुर्बल घटकांसाठी विशेष कायदे करण्याची तरतूद घटनेमध्ये केलेली आहे. विकासामध्ये स्त्रियांचे सर्व क्षेत्रात भरीव योगदान असून सुद्धा, स्त्रियांकडे बघण्याचा समाजाचा आणि शासनाचा दृष्टीकोन प्रामुख्याने कल्याणकारी उपक्रमांच्या लाभार्थी असाच राहिला आहे. स्त्रिया विकास प्रक्रियेचा अविभाज्य घटक आहेत, या तत्वाकडे दुर्लक्ष झालेले आहे. राष्ट्रीय विविध चळवळी, विषमता निर्मूलन, सामाजिक सुधारणा, उत्पादन प्रक्रिया, इ. मध्ये स्त्रियांचा महत्त्वपूर्ण सहभाग असून विकासातील कामामध्ये स्त्रियांचे योगदान मोठे आहे.

महानगरपालिका, नगरपरिषदा आणि नगरपंचायती यामध्ये महिला व बाल कल्याण समिती स्थापन करुन विविध योजना राबवण्याबाबत शासन निर्णय निर्गमित केले आहेत. महाराष्ट्र शासनाचे महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम, १९६५ मध्ये सन १९९२ मध्ये दुरुस्त करुन आणि महानगरपालिका, नगरपरिषदा आणि नगरपंचायती मध्ये सर्वप्रथम दि. १७ एप्रिल १९९३ चे शासन पत्र क्रमांक जीईएन-१०९३/३२५/प्र.क्र.२४/नवि-३२ द्वारा 'महिला व बाल कल्याण समिती' स्थापन करण्याचा आणि त्या समितीने करावयाची कामे प्रस्तुत करण्यात आली. त्यामध्ये बदलत्या परिस्थितीनुसार बऱ्याच योजना / कार्यक्रमांमध्ये बदल सुधारणा करुन दि. ३० डिसेंबर २००६ रोजी सुधारीत शासन निर्णय क्रमांक संकीर्ण२००५/ प्र.क्र.१५६/नवि-२० नगर विकास विभागाने निर्गमित केला. तसेच सर्व महानगरपालिका, नगरपरिषदांनी त्यांचा बांधिल खर्च (Committed Expenditure) भागवल्यानंतर राहिलेल्या रक्कमेतील ५% रक्कम महिला व बालकल्याण समितीच्या कार्यक्रमासाठी / कामासाठी वर्ग करावी आणि खर्च न करता राहिलेली रक्कम व्यपगत न करता पुढील वर्षात वर्ग करुन महिला व बालकल्याण समितीच्या कामासाठी उपलब्ध करावी असे निर्देश या शासन निर्णयात देण्यात आले आहे.

अर्थसंकल्पामध्ये काही तरतूद करुन महिला व बालकांसाठी कल्याणकारी उपक्रमांचे लाभार्थी म्हणून काम करणे पुरेसे नाही. खरेतर महिलांचे सक्षमीकरण म्हणजेच देशाचा विकास ह्या तत्त्वाचा अवलंब करुन शहर विकासामध्ये महिला व बालके यांच्या गरजांचा सारासार विचार करुन विकास कामामध्ये त्यांच्यासाठी तरतूद केली पाहिजे.

या सर्वांचा विचार करुन महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाने जानेवारी, २००९ मध्ये फॅक्स संदेश क्रमांक संकीर्ण १००८/प्र.क्र.२०४/ नवि-४ द्वारा सर्व महानगरपालिकांना सन २००९-१० चा अर्थसंकल्प तयार करताना सदर अर्थसंकल्पामध्ये महिलांकरिता (Gender Budget), गरीबांकरिता, (Budget for poor), व अपंगांकरिता तरतूदी कराव्यात. तसेच महानगरपालिकेचा अर्थसंकल्प Outcome Budget स्वरुपात तयार करावा अशा सूचना निर्गमित केल्या आहेत.

स्त्री-पुरुष समानता आणि लिंग समभाव ही मुल्ये महानगरपालिकेच्या सर्व विभागांच्या नियोजनात, योजना कामांमध्ये प्रतिबिंबित होण्यासाठी 'जेंडर बजेटींग' होणे आवश्यक आहे. याचा उपयोग महिलांचा आर्थिक सहयोग वाढविण्यासाठी, आर्थिक संधी उपलब्ध होण्यासाठी, सक्षमीकरणासाठी, शैक्षणिक, व्यावसायिक योग्यता वाढविण्यासाठी, आरोग्य वृद्धिंगत करण्यासाठी, राजकीय सहभाग आणि सामाजिक प्रतिष्ठा वाढवण्यासाठी होईल. याकरिता नियोजन प्रक्रियेत आणि आर्थिक मूल्यमापन प्रक्रियेत महिलांचा स्वतंत्रपणे विचार व्हायला हवा. जेंडर बजेटचा पाठपुरावा करण्यासाठी आणि ते प्रत्यक्षात उतरण्यासाठीची जबाबदारी महानगरपालिकेकडे आहे.

'जेंडर बजेट' मध्ये सार्वजनिक निधीचे (Public Resources) समान वाटप (Equitable allocation) विशेष करुन उपेक्षित वर्गातील महिला व बालकांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी होणे अंतर्भूत आहे. 'जेंडर बजेट' म्हणजे 'महिलांसाठी अर्थसंकल्पात तरतूद करणे' असे नसून, अर्थसंकल्पीय तरतूद करतांना त्या त्या कामात महिलांच्या समस्या आणि गरजा कशा भागविल्या जातील हे बघणे आहे. महानगरपालिकेमध्ये निर्णय घेताना, अंमलबजावणी करताना, खर्च करतांना महिला, बालके, मुले-मुली, इ. घटकांच्या समस्या व गरजा यांचा विचार करुन त्या सोडवण्यासाठी निर्णय घेणे आणि महिलांचा सहभाग घेणे म्हणजे 'जेंडर बजेट' होय. महानगरपालिकेचा निधी अगदी राज्य व केंद्र शासनाकडून येणारे अनुदान व निधीचा काही ठराविक हिस्सा आणि प्रत्येक विभागाने अर्थसंकल्पीय तरतूदीचा काही ठराविक हिस्सा फक्त महिला आणि बालके केंद्रित कामासाठी वापरणे म्हणजे 'जेंडर बजेट' होय.

महानगरपालिकेत 'जेंडर बजेट' कक्ष स्थापन करावा. महानगरपालिकेतील सर्व विभाग या कक्षाशी जोडून घ्यावे. महानगरपालिकेचे अर्थसंकल्प बनवणारे प्रमुख लेखापाल आणि अर्थसंकल्प विभाग यांनी सर्व विभागांमध्ये समन्वय साधून या कक्षा मार्फत जेंडर बजेट बनवून त्यांची अंमलबजावणीचे कामकाज करावे.

महानगरपालिकेच्या सर्व विभागांचे अर्थसंकल्प बनविताना महिलांच्या गरजा, महिला धोरण नजरेसमोर ठेवूनच तयार केले पाहिजेत. प्रत्येक विभागाने महिलांसाठी अंमलात आणलेल्या जेंडर कामांची, कार्यक्रमांची माहिती, अंमलबजावणीचा समाजावर झालेला प्रभाव (Impact), त्यासाठी लागलेला निधी, प्रत्यक्ष वापर केलेला निधी, साध्य केलेली उद्दिष्टे / लक्ष्य यांचा अहवाल, विभागाचा Outcome Budget प्रगती या फलीत अहवाल Performance Budget मध्ये प्रदर्शित करुन महिला व बाल कल्याण समिती, स्थायी समिती, इतर संबंधित समित्या आणि महानगरपालिका यांना माहितीसाठी सादर करावे. सामाजिक लेखापरिक्षण (Social Audit) ही करावे. त्यामुळे महिला व बाल कल्याण समितीच्या अनेक आग्रहांपैकी जेंडर बजेट चे नियोजन व त्याची अंमलबजावणी हा आग्रह नक्कीच असू शकतो.

**डॉ. (प्रा.) स्नेहा पळणीटकर**
संचालिका,
अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, मुंबई

# अंतरंग


- महानगरपालिका एक अवकाश ५
  **'महिला व बाल कल्याण समित्यांची यशोगाथा'**
  *श्री. रणजित चव्हाण, महासंचालक, अ.भा.स्था.स्व.संस्था, मुंबई*
  *श्री. लक्ष्मणराव लटके, मानद संचालक, अ.भा.स्था.स्व.संस्था,*

- विशेष लेख ७
  **'महिला व बालकल्याण समित्यांचे कामकाज'**
  *भारती शर्मा, स्मिता वायंगणकर, शिल्पा जाधव, सुनिती हुंडीवाले*

- ७४ व्या घटनादुरूस्तीचे प्रगतीपुस्तक ९
  **'राज्य वित्त आयोग'**
  *श्री. प्रशांत पिसोळकर, वरिष्ठ सल्लागार, अ.भा.स्था.स्व.संस्था,*

- शहरनामा ११
  **'मालेगाव शहर' विकास प्रश्नांचा ताणा-बाणा**
  *सीमा काकडे, प्रयास, पुणे*

- खुले पान १४
  **'महिला व बालकल्याण समितीविषयी उदासिनता'**
  *श्रीमती मोहिनी पत्की, नगरसेविका,सोलापूर महानगरपालिका*

- नागरी कारभाराचा अजेंडा - शासन निर्णय व योजनांची माहिती १५
  *महानगरपालिका, नगरपरिषदा व नगरपंचायती यामध्ये*
  *महिला व बालकल्याण समितीने राबवायच्या विविध योजना*

## 'महानगरपालिका एक अवकाश'

# महिला व बालकल्याण समित्यांची यशोगाथा

आपल्या देशात प्रथम कर्नाटक राज्याचे मुख्यमंत्री रामकृष्ण हेगडे यांनी पंचायतीमध्ये महिलांसाठी २५ टक्के जागा राखून ठेवण्याचे विधेयक १९८३ साली मंजूर केले. त्याला राष्ट्रपतींनी ४ वर्षे संमती दिली नाही म्हणून पंचायत राज मंत्र्यानी राष्ट्रपती भवनासमोर धरणे धरण्याची घोषणा केल्यानंतर १९८७ ला मंजूरी दिली. त्यानंतर आरक्षणाचा कायदा अमलात आला.

कर्नाटक राज्याने केलेल्या कायद्यामुळे राष्ट्रीय पातळीवरही पंचायती व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये महिलांसाठी आरक्षण ठेवण्याच्या विचाराला चालना मिळाली. राजीव गांधी यानी महिलांसाठी आरक्षण ठेवण्यासाठी घटनात्मक तरतूद व्हावी यासाठी प्रयत्न केले. या दोन्ही क्षेत्रात ३० टक्के आरक्षण ठेवण्यासंबंधीचे विधेयक, संसदेमध्ये १५ मे १९८९ ला सादर केले पण; राज्यसभेने ऑक्टोबर १९८९ ला ते नामंजूर केले. व्ही. पी. सिंग पंतप्रधान असताना १/३ जागा महिलांसाठी राखून ठेवण्याचे घटना दुरूस्तीचे विधेयक सादर केले पण त्यांच्या कारकिर्दीत त्यावर निर्णय झाला नाही. पी. व्ही. नरसिंहराव याच्या पंतप्रधानाच्या कारकिर्दीत पंचायती राज व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेत महिलासाठी १/३ जागा राखून ठेवण्याचे घटना दुरूस्ती विधेयक १९९२ साली मंजूर झाले. भारतीय स्वातंत्र्यानंतर ही सर्वात मोठी घटना म्हणण्यास हरकत नाही.

पंचायत राज व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये महिलांना आरक्षण मिळाले परंतु संसदेत व विधानमंडळात अद्याप मिळालेले नाही. संसद व विधानमंडळात महिलांना आरक्षण मिळावे यासाठी घटना दुरूस्तीचे विधेयक १९९६, १९९८ व १९९९ ला संसदेत सादर केले परंतु त्यावर आजपावेतो निर्णय नाही. जगातल्या ३८ देशांनी त्यांच्या संसदेमध्ये महिलासाठी जागा राखून ठेवण्याचे कायदे केले आहेत. आपल्या शेजारच्या पाकिस्तान, बांगलादेश, नेपाळ, अफगाणिस्थान या देशांनी महिलांसाठी जागा राखून ठेवण्यासाठी कायदे केले, आहेत. भारताच्या संसदेमध्ये व जगातल्या इतर १२८ देशांच्या संसदेमध्ये निवडून येणाऱ्या महिलांचे प्रमाण पाहिले तर भारताचा क्रमांक ११४ वा लागतो.

महाराष्ट्रात श्री. शरद पवार मुख्यमंत्री असताना नागरी स्थानिक स्वराज्य संस्थात महिलांसाठी २७ टक्के जागा राखून ठेवण्याचा कायदा १९९१ साली मंजूर झाला व त्यानंतर १९९२ साली महापालिका व नगरपालिका अधिनियमात महिला व बालकल्याण समिती स्थापन करण्याची तरतूद झाली. **नगरपालिकेमध्ये ती वैधानिक समिती असून महानगरपालिकेमध्ये ती विशेष समिती आहे.** महिलांना आरोग्य, शिक्षण व मूलभूत सेवासंबंधीची तसेच कुटुंबातील महिलांना दररोज कोणत्या समस्यांना सामोरे जावे लागते याची त्यांना चांगली माहिती असते. त्यामुळे महिलांच्या समस्या सोडविण्यासाठी निर्णय घेण्याचे अधिकार महिला व बालकल्याण समितीलाच असणे उचित आहे. महानगरपालिकेतही ही समिती वैधानिक असली पाहिजे व या समितीस ठराविक मर्यादेपर्यंत प्रशासकीय व आर्थिक मंजूरी देण्याचे अधिकार असले पाहिजेत.

अधिनियमामध्ये दुरूस्त्या झाल्यानंतर पालिकांमध्ये महिला व बालकल्याण समित्यांच्या स्थापना झाल्या. परंतु या समितीने कोणती कामे करावयाची यासंबंधी १७ एप्रिल १९९३ च्या पत्राने शासानाच्या नगरविकास विभागाकडून मार्गदर्शन झाले. या पत्रामध्ये पालिका जर प्रसुतिगृहे, बालवाड्या, सुधारगृहे, अनाथाश्रम इ. चालवित असेल तर त्यांचे कार्यान्वियन, गलिच्छ वस्ती, झोपडपट्ट्यांमध्ये आरोग्य व स्वच्छता यावर लोकशिक्षण, लसीकरण व महिला आर्थिक विकास महामंडळाच्या योजना राबविण्यासाठी महिलांना प्रोत्साहित करणे अशा प्रकारची कामे सोपविली होती.

त्यानंतर नगरविकास विभागातील १४ जुलै १९९१ च्या पत्राने पालिकेवर कायमच्या खर्चाचा बोजा पडेल अशी कोणतीही पदे समितीसाठी मंजूर करू नयेत असे कळविले. पुढे याच पत्रात असे नमूद होते की महिला व बालकल्याणाचे कार्यक्रम राबविण्यासाठी स्वयंसेवी संस्था, उद्योजक, व्यापारी यांची मदत घ्यावी व नगरपालिका निधीचा अत्यंत निकडीच्या कामासाठी उपयोग करावा. शासनाच्या अन्य विभागांमार्फत महिला व बालकल्याणाचे कार्यक्रम राबवित असल्यास तसे कार्यक्रमपालिकेने राबवू येत. शासनाची दोन्ही पत्रे पहाता पालिकेतील महिला व बालकल्याण समितीला फारसे काही करता येईल अशी स्थिती नव्हती. मात्र वर उल्लेखलेल्या दुसऱ्या

पत्रातील महत्वाची बाब म्हणजे पालिकेने एकूण महसूली उत्पन्नाच्या शेकडा ५ टक्के इतकी रक्कम (अत्यावश्यक बाबीवरील खर्च वजा जाता) पालिकेने दरवर्षी अंदाजपत्रकात महिला व बालकल्याण समितीसाठी राखून ठेवली पाहिजे.

**अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेने २००२ साली महाराष्ट्रातील सर्व नगरपालिकांकडून २०००-०१ ते २००४-२००५ या कालावधीत महिला व बालकल्याण समितीने अंदाजपत्रकात राखून ठेवलेल्या रकमेपैकी किती रक्कम व कोणकोणत्या कामावर खर्च केली याची माहिती मागविली. बऱ्याच नगरपालिकानी दिलेल्या माहितीवरून असे दिसून आले की काही पालिकानी काहीच खर्च केला नाही. तर काही पालिकानी बजेट तरतुदीपैकी १० ते १५ टक्के एवढीच रक्कम खर्च केली अगदी मोजक्या नगरपालिकांनी बजेट तरतुदीप्रमाणे रक्कम खर्च केली होती.**

बजेटमधील रक्कम खर्च न होण्यामागील कारणे काय आहेत हे जाणून घेण्यासाठी संस्थेने १४ फेब्रुवारी २००६ रोजी राज्यातील सर्व नगरपालिकेतील महिला व बालकल्याण समिती सभापतींची परिषद आयोजित केली होती. सदर परिषदेस तत्कालीन नगरविकास विकास खात्याचे राज्यमंत्री मा.ना.श्री. राजेश टोपे व नगरविकास खात्यातील काही अधिकारी उपस्थित होते. **उपस्थित सभापतींनी बजेटमध्ये राखून ठेवलेली रक्कम कोणत्या कामावर खर्च करावयाची याचे स्पष्ट मार्गदर्शन नसल्याने बजेटमध्ये समितीसाठी केलेली तरतूद खर्च करू शकलो नाही. तसेच समितीच्या कार्यालयीन कामासाठी स्वतंत्र कर्मचारी वर्ग उपलब्ध नाही तो उपलब्ध करावा** अशा सूचना मांडल्या. मा. नामदार मंत्री महोदयानी सभापतीनी मांडलेल्या व्यथाचा विचार केला जाईल असे आश्वासन दिले.

या परिषदेची फलश्रुती म्हणजे महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाकडील दि. ३०डिसेंबर २००६ साली झालेला निर्णय. या निर्णयाने दारिद्रय रेषेखालील महिलांना विविध प्रकारचे व्यवसाय शिक्षण, महिला व बालकांच्या स्पर्धा, पाळणाघरे, अपंगांना मदत, कोणत्याही क्षेत्रात उत्कृष्ट काम केलेल्या महिला व मुला-मुलींचा सत्कार, आरोग्य शिबीरे, महिला व बालकांसाठी स्वतंत्र वाचनालय, प्रसाधनगृहे, बालोद्यान, क्रीडा साहित्य, ग्रंथालय, सांस्कृतिक सभागृह असे सुमारे ३० कार्यक्रम राबविण्यास समितीला अधिकार दिले. शासनाच्या या निर्णयामुळे महिला व बालकल्याण समितीच्या कार्यक्रमांना वेग आला. बजेटमधील तरतूद खर्च होवू लागली. हजारो महिलांना व्यवसाय प्रशिक्षण दिले जात आहे. गरीब महिलांना स्वतःचा व्यवसाय सुरू करता येवू लागला आहे. समितीच्या मार्गदर्शनासाठी हजारो बचत गट स्थापन झाले. बचत गटांनीही व्यवसाय सुरू केले. गटातील महिलांचे उत्पन्न वाढले. पालिकांनीही बचत गटाला विविध प्रकारची कामे दिली. गरीब विद्यार्थींनाही शाळेत जाण्यासाठी बसचे पास मोफत दिले, काहींना सायकलीचे वाटप केले, पाळणा घरे सुरू केली. शालेय विद्यार्थांना गणवेष, दप्तर व वह्याचे मोफत वाटप सुरू झाले. बालवाडीतील मुलांना सकस पोषक आहाराचा पुरवठा होवू लागला. शाळांमध्ये मुलीसाठी क्रीडांगणे, प्रसाधनगृहे झाली. क्रीडा साहित्य पुरविले गेले. अनेक प्रकारची आरोग्य शिबीरे आयोजित केली जात आहेत. अधिनियमातील तरतुदी, सभा कामकाज प्रणाली, पालिकेसाठी असलेल्या शासनाच्या योजना या समजावून देण्यासाठी वर्ष २००४ पासून ते मार्च २०१३ पर्यंत विविध विषयांवर प्रशिक्षण देण्यासाठी १४२ प्रशिक्षण वर्ग अ. भा. स्था.स्व.संस्थेने आयोजित केले. या वर्गांचा लाभ ८,७०० नगरसेवक नगरसेविकांनी घेतला आहे. महिला व बालकल्याण समितीच्या सदस्यांसाठी १० प्रशिक्षणवर्ग घेतले. त्यात १,४९४ नगरसेविकांनी भाग घेतला.

अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था महिला व बाल कल्याण समितीने सक्षम होण्यासाठी व या मार्फत कार्यक्रम राबवण्यासाठीचे मार्गदर्शन व प्रोत्साहन सातत्याने देत आहे व हा एक त्यांचा महत्वाचा आग्रह ही आहे.

**श्री. रणजित चव्हाण, महासंचालक**
**श्री. लक्ष्मणराव लटके, मानद संचालक**
अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, मुंबई

❒❒❒

## ‘विशेष लेख’

# महिला व बाल कल्याण समित्याचे कामकाज

महिला नगरसेविकांना कुठल्या समितीचे ‘सभापती’ पद सहजरित्या व अग्रक्रमाने मिळते ? याचे उत्तर उघड आहे. ‘महिला व बाल कल्याण समितीचे अध्यक्ष पद !’ महिला लोकप्रतिनिधीशी संवाद साधताना नेहमीच हे जाणवते की आरोग्य, शिक्षण, परिवहन, नियोजन अशा समित्याचे सभापती पद महिलांच्या वाट्याला फारसे येत नाही आणि स्थायी समितीच्या अध्यक्षपदी महिलातर क्वचितच दिसतात. तसेच ‘महिला -बालकल्याण समिती’ मध्ये पुरूष नगरसेवक दिसतात का ? जरा शोधच घ्यावा लागले. घरात जे काम फक्त महिलांचे मानले जाते. स्थानिक स्वराज्य संस्थेतही महिलांसाठीचे काम महिलांकडेच सोपविले जाते. या मागचा विचार काय आहे, ते काम इतरांना कमी महत्वाचे का वाटते. हा समजून घेण्याचा महत्वाचा मुद्दा आहे.

मात्र ही समिती जवळ जवळ पूर्णपणे महिलांकडे सुपूर्द केली जाते. राजकारणात तुलनेने नवख्या असलेल्या नगरसेविकांना इथे काम करणे सुलभ वाटते, असा अनुभव ऐकायला मिळतो. म्हणून मग आम्ही असा विचार केला की ‘महिला - बाल कल्याण समिती’ बाबत जरा तपशिलात माहितीची देवाण-घेवाण करायला हवी. संबंधीत तरतूदी, निधी उपक्रम या बाबत काय रचना आहे. कल्पकतेने कोणते कार्यक्रम घेतले जातात याची माहिती घ्यायला हवी.

महानगरपालिका व एका नगरपरिषदेतील या समिती सदस्यांकडून माहिती गोळा करण्याचा प्रयत्न आम्ही केला.ही माहिती घेतांना खालील मुद्दे आम्ही विचारात घेतले आहेत.

‘महिला-बालकल्याण समिती’ ला नगरपरिषदेत वैधानिक दर्जा दिलेला आहे. मात्र महानगरपालिकेत ही फक्त एक विषय समितीच आहे. हे वेगळेपण दूर व्हावे असे वाटते का ?

‘महिला-बाल-कल्याण समितीसाठी’ किती तरतूद केली जाते ? तर सर्व साधारणपणे नगपरिषदेच्या एकूण महसूल उत्पन्नामधून बांधील खर्च (Commited expenditure म्हणजे पगार ठेवी, कर्ज, हप्ते, इतर निधीचे हप्ते इ.) वगळून उर्वरित रकमेच्या ५% निधी उपलब्ध करून दिला पाहिजे. महानगरपालिकेतही हाच नियम पाळला जातो का ?

- हा ५% निधी कशासाठी वापरायचा, या बाबत काही निकष, नियम आहेत का ?
- सर्व पक्षीय महिला सदस्यांच्या चर्चेतून रूपरेषा ठरविली जाते का ?
- निधी कमी पडल्यास अन्य आर्थिक स्त्रोत शोधले जातात का ?
- बालकांच्या विकासासाठी अंगणवाडी, बालवाडी या पालिकडे निधीचा वापर केला जातो का ?
- महिलांची सुरक्षा, प्रबोधन, आधार केंद्र हे प्रश्न महिला बाल कल्याण समिती हाताळते का ? ते कसे
- एक लाखांवरचे प्रस्ताव स्थायी समितीत मंजूर करून घ्यावे लागतात. महानगपालिकांमध्ये ही मर्यादा वाढविण्याची गरज जाणवते का ?
- महिला बालकल्याण समितीला काही विशेष अधिकार असतात का ?

हे व असे मुद्दे घेऊन आम्ही जी माहिती घेतली ती थोडक्यात इथे देत आहोत. हेतू हा आहे की या समितीबद्दलचे अनुभव, अडचणी, नवीन कल्पना सर्वांसमोर याव्यात व त्यातील उणीवा दूर करायला आपापल्या ठिकाणी प्रयत्न करता यावेत जे अभिनव उपक्रम सुरू असतील त्यापासून प्रेरणा घेऊन इतर ठिकाणी ही नवीन उपक्रम हाती घेता येतील.

वसई विरार महानगरपालिका व पनवेल नगरपरिषद यामधील नगरसेविकांशी ‘महिला व बाल कल्याण समिती’ (यापुढे ‘समिती’ असा उल्लेख असेल) संदर्भात चर्चा केली असता काही महत्त्वाचे मुद्दे पुढे आले.

**पनवेल नगरपरिषदेतील ‘समिती’ विषयी** समिती सभापती श्रीमती निर्मला म्हात्रे, सदस्य श्रीमती प्रमिला कुरघोडे, श्रीमती स्मिता पाटील, श्रीमती निलम घरत, श्रीमती संगीता कानपाल, श्रीमती निता माळी, श्रीमती अलका भगत, श्रीमती सीता पाटील, श्रीमती सुरेखा मोहकर, श्रीमती सुनंदा पाटील व श्री. प्रकाश बिनेदार यांच्यासोबत चर्चा केली.

- नगरपरिषदेतील या ‘समिती’ ला वैधानिक दर्जा आहे. १९९२ मध्ये समितीचे गठन झाले. खरं तरं या समितीमध्ये समितीचा सभापती व सदस्य या ‘महिलाच’ असतात. मात्रं पनवेल नगरपरिषदेतील या समितीवर पुरूष सदस्य आहे ! जाणीवपूर्वक पुरूष सदस्याची नियुक्ती या समितीवर केली आहे. श्री. बिनेदार हे आंबेडकरी चळवळीतील सक्रीय कार्यकर्ते, सामाजिक कामात सातत्याने सहभागी होणारी व्यक्ती व सामाजिक भान असणारी व्यक्ती म्हणून ‘समिती’ वर आग्रहाने त्यांची नियुक्ती केली. या समितीमध्ये सर्व पक्षाच्या महिला सदस्या आहेत.

- सुरूवातीला या समितीसाठी स्वतंत्र बजेट नव्हते. शिक्षण समितीसाठी राखून ठेवलेल्या निधीतील काही भाग या समितीसाठी वापरला जाई. मात्र  त्यानंतर 'समिती'साठी स्वतंत्र निधीची तरतूद करण्यात येऊ लागली. मात्र अजूनही शासन निर्णयानुसार या समितीसाठी एकूण अंदाजपत्रकाच्या ५% इतकी तरतूद  केली जात नाही. निधी कमी पडल्यास 'समितीच्या' प्रस्तावित योजनांसाठी अन्य समित्यांकडे प्रस्ताव दिले जातात. उदा. बालवाडी अथवा स्वच्छतागृहांचे बांधकाम यासंबंधीचा प्रस्ताव 'बांधकाम समितीकडे' पाठविणे.  या समितीचे महत्व अधिक आहे कारण याद्वारे समाजाला थेट भिडता येते, असे सभापती व सदस्यांना वाटते. या समितीने त्यांना असलेल्या अधिकाराचा योग्य व संयमी वापर करून मुलांच्या वसतीगृहांना अचानक भेट देऊन पाहणी केली. याचा सविस्तर वृत्तांत संबंधित शासकीय विभागाला कळवला. या माध्यमातून वसतीगृहाच्या हलाकीच्या स्थितीची दखल घेतली गेली.
- समितीच्या निधीतून विशेष उपक्रम राबविले आहेत. फेब्रुवारी २०१३ मध्ये शहरातील बालवाडींचे सर्व्हेक्षण केले. यामध्ये साधारण ३१ बालवाड्यांमधील ५०० विद्यार्थ्यांचा समावेश होता. या मधून ज्या उणिवा, प्रश्न समोर आले त्या आधारे समितीने आगामी कार्यक्रमांचे नियोजन सुरू झाले आहे.
- समितीमध्ये सर्व पक्षांचे प्रतिनिधित्व असल्यामुळे सर्वांच्या समितीने निर्णय घेतले जातात. विचार विनियमाने प्रस्ताव करून सर्वसाधारण सभेसमोर ठेवले जातात. सर्वसाधारण लाख रूपये खर्चाचे अधिकार असल्यामुळे  त्यावरील खर्च मंजूरीसाठी स्थायी समितीकडे  जावे लागते. यामुळे योजना प्रत्यक्ष कार्यान्वयित करण्यास विलंब होतो. मंजूरी मिळण्यास अडथळे ही येतात. त्यामुळे  खर्च करण्याच्या अधिकारांमध्ये वाढ व्हावी असे पनवेलमधील 'समिती' सभापती  व सदस्यांना वाटते.
- महिला व मुलांसाठीच्या विकास योजना या केवळ याच समितीच्या निधितूनचं प्रस्तावित करता येतात असे नाही. महिलांसाठी  विशेष सभागृह-'महिला भवन', स्वच्छतागृहे, बचत गटांना प्रशिक्षण यासाठीच्या निधीची मागणी शहराच्या सर्वसाधारण अंदाजपत्रकातून केली आहे; असे समिती सभापती व सदस्यांनी आवर्जून नमूद केले.
- अखर्चित निधी हा वर्षाअखेरिस अन्य ठिकाणी वळवला जातो. या निधीचा उपयोग बालवाडी, अंगणवाडी संबंधीत वेतनावरही खर्च केला  जातो. त्यामुळे समितीने प्रस्तावित केलेल्या कामांसाठी निधी कमी पडतो हा सर्वसामान्य अनुभव आहे. मात्र गेल्या काही वर्षापासून समितीने राखून ठेवलेला निधी समितीच्या कार्यक्रमांसाठी पूर्णतः खर्च करण्याचे उद्दिष्ट समिती सदस्यांनी निश्चित केले असून त्यांची अंमलबजावणीही सुरू आहे.
- या समितीला अन्य समित्यांच्या तुलनेत कमी महत्व दिले जाते. ही दुर्लक्षित समिती आहे. नगरसेवक नव्हे तर प्रशासनाच्या दृष्टीनेही कमी महत्वाची समिती आहे. हा दृष्टिकोन बदलायला हवा. असे सर्वांनी आवर्जून नमूद केले.

**वसई-विरार महानगरपालिकेतील 'समिती' विषयी** श्रीमती भारती देशमुख माजी सभापती महिला व बाल कल्याण समिति व वर्तमान नगरसेविका यांच्याशी चर्चा केली असता.

- समिती सदस्याची संख्या पक्षाच्या बलाबल संख्येनुसार ठरवली जाते. सभापती पद हे एका वर्षासाठी असते. महिन्यातून एकदा बैठक होते. या बैठकांमध्ये 'महिला व बाल कल्याण समितीने राबवायच्या योजना विषयीच्या शासन निर्णयानुसार कार्यक्रमांचा विचार केला जातो. महानगरपालिका असल्यामुळे समितीला वैधानिक दर्जा नाही. मर्यादित आर्थिक अधिकार आहेत. एक लाखापेक्षा जास्त खर्च करण्यासाठी स्थायी सभापतीची मंजूरी घ्यावी लागते.
- समितीच्या कार्याची कक्षा, व्यापक आहे. नवजात बालकापासून ते वृध्द महिलांसाठीच्या योजना आहेत.
- एकूण बजेटमधील आस्थापना खर्च वगळता उर्वरित बजेटच्या ५% निधी हा 'समिती' ला दिला जातो. निधी मिळविण्यासाठी ताकद लागते. भांडून मिळवावा लागतो.
- या समितीला दिलेला निधी पुरत नाही. त्यामुळे काही योजनांसाठी पी बजेट (गरीबांसाठीचे बजेट) मधून निधीसाठी प्रस्ताव मांडावा लागतो.
- प्रशासनाची साथ महत्त्वाची आहे. त्यांच्या सहकार्यामुळे कामे लवकर होवू शकतात.
- समितीला वैधानिक दर्जा दिला पाहिजे. आर्थिक अधिकार दिले पाहिजेत. छोट्या छोट्या निर्णयासाठी स्थायी समितीवर अवलंबून रहावे लागते. हे चित्र बदलायला हवे.
- इथल्या समितीने बचत गटांचे सुदृढीकरणावर भर दिला गेला आहे. विविध प्रकारचे प्रशिक्षण दिले जाते. प्रशिक्षित बचत गट अन्य बचत गटांना प्रशिक्षण देतात. बी पी एल बचत गटांना अनुदान मिळते मात्र ए पी एल गटांना कुठलेच अर्थसहाय्य नसते. समितीच्या माध्यमातून यांचा विशेष विचार केला जातो. या बचत गटांनी स्वतःची वेबसाईटही सुरू केली आहे.

*संकलन : भारती शर्मा,*
*स्मिता वायंगणकर, शिल्पा जाधव व  सुनिति हुंडीवाले*

## '७४ व्या घटनादुरूस्तीचे प्रगतीपुस्तक'

# राज्य वित्त आयोगाची स्थापना

भारतीय राज्यघटना सुधारणा (७४ वी) अधिनियम, १९९२ च्या कलम २४३ वाय मध्ये राज्य वित्त आयोगाच्या स्थापनेची तरतूद करण्यात आलेली आहे. प्रत्येक राज्यातील नगरपालिकांच्या आर्थिक कामकाजावर लक्ष ठेवण्यासाठी केंद्रीय वित्त अयोगाच्या धर्तीवर दर पाच वर्षानी राज्य वित्त अयोग स्थापन करावयाचे आहेत. नगरपालिकांच्या बाबतीत योग्य आर्थिक सुधारणा तसेच त्यांचे आर्थिक प्रश्न सोडविण्यासाठी उपाययोजनादेखील राज्य वित्त आयोगाने सुचवाव्यात असे यात नमूद करण्यात आले आहे.

**कलम २४३ वाय वित्त आयोग -**

(१) कलम २४३ - वाय अंतर्गत स्थापन करण्यात आलेला वित्त आयोग नगरपालिकांच्या आर्थिक स्थितीचा पडताळा घेईल व राज्यपालांकडे खालील बाबतीत सूचना सादर करेल.

(अ) खालील बाबींसाठी मार्गदर्शक तत्त्वे

१. राज्य सरकारकडून आकारण्यात येणारे कर, शुल्क, टोल इत्यादींमार्फत मिळणाऱ्या महसुलाची राज्य सरकार व नगरपालिका यांच्यामधील विभागणी व अशा महसुलामध्ये नगरपालिकांचा जो हिस्सा असतो त्याची सर्व स्तरावर विभागणी.

२. नगरपालिकां मार्फत आकारायचे कर प्रशुल्क, टोल व शुल्क यासंबंधी.

३. राज्याकडे जमा झालेल्या महसुलातून नगरपालिकांना द्यावयाचे सहाय्यक अनुदान

(ब) नगरपालिकांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा घडवून आणण्यासाठी आवश्यक उपाययोजना

(क) नगरपालिकांचे आर्थिक कामकाज सुरळीतपणे चालावे यासाठी राज्यपालांनी राज्य वित्त आयोगाकडे सोपवलेल्या इतर कोणत्याही बाबी.

(२) राज्य वित्त आयोगाचा अहवाल राज्य विधासभेसमोर मांडण्याआधी त्यातील प्रत्येक सूचनेसोबत त्याबाबत करावयाच्या कृतीसंदर्भात राज्यपालांचे खुलासेवार टिपण जोडलेले असेल.

सर्व राज्यांमध्ये दर पाच वर्षांनी राज्य वित्त आयोग स्थापन करण्यात येतो. राज्यांचे कर, शुल्क, टोल व इतर शुल्क यांचे राज्य सरकार व नगरपालिका यांच्या दरम्यान तसेच विविध नगरपालिकांदरम्यान वाटप कशाप्रकारे केले जावे याबाबतच्या सूचना राज्य वित्त आयोगांकडून देण्यात येतात. त्याचप्रमाणे विविध कर, शुल्क यांची आकारणी कशाप्रकारे केली जावी व करांच्या माध्यमातून राज्यांकडे जमा होत असलेल्या महसुलातून नगरपालिकांना सहाय्यक अनुदान कशाप्रकारे दिले जावे याबाबतच्या मार्गदर्शक सूचनादेखील राज्य वित्त आयोग मांडत असतो.

**राज्य वित्त आयोगाने केलेल्या मार्गदर्शक सूचना व त्यांची निरिक्षणे यांची नोंद सरकारला घ्यावी लागते. या सर्व सूचना स्विकारून त्यांची अंमलबजावणी करणे हे राज्य सरकारवर कायदेशीररित्या बंधनकारक आहे. त्यामुळे या सूचनांच्या वैधतेबाबतचा मुद्दा महत्वाचा ठरतो. भारतीय राज्यघटना सुधारणा (७४वी) अधिनियम, १९९२ मध्ये या मुद्याबाबत मौन पाळले गेले आहे.**

राज्य वित्त आयोगाने दिलेल्या सूचनांची राज्य सरकारांकडून अंमलबजावणी केली जाणे व कृती अहवाल सादर केला जावे यासाठी निश्चित वेळापत्रकाचा अभाव या मुद्याकडे गांभीर्याने लक्ष दिले जाणे आवश्यक आहे. राज्य सरकारने या मुद्यावर तोडगा काढलेला नसल्याने राज्य वित्त आयोगाने केलेल्या सूचनांची अंमलबजावणी संबंधित राज्य सरकारच्या मर्जीनुसार केली जाते, सहाजिकच या अंमलबजावणीचा वेगही बऱ्यापैकी धीमा असतो.

१९९२ सालापासून महाराष्ट्र राज्य सरकारने तीन राज्य वित्त आयोग स्थापन केले. या आयोगांनी आपले अहवाल राज्यपालांकडे सादर केले. कलम २४३ वाय (२) मधील तरतुदींनुसार राज्य वित्त आयोगाने केलेल्या सूचना राज्यपालांनी त्यासंदर्भातील कृतीचा समावेश असलेल्या खुलासेवार

टिपणासहीत राज्य विधानसभेसमोर मांडणे आवश्यक आहे. त्यामुळे राज्य वित्त आयोगाच्या अहवालाचा अभ्यास व परीक्षण करणे आवश्यक आहे. आत्तापर्यंतच्या तीन राज्य वित्त आयोगांचे अहवाल राज्य सरकारने स्विकारले आहेत व त्यावर अंमलबजावणीदेखील केलेली आहे. आता चौथा राज्य वित्त आयोग स्थापन करण्यात आला आहे व नगरपालिकांबाबतच्या आर्थिक दृष्टीकोनातून परीक्षण करण्याचे काम सुरू असून त्यांचा अहवाल अद्याप यावयाचा आहे.

भारतीय राज्यघटना सुधारणा (७४वी) अधिनियम, १९९२ च्या कलम २८० (३) (सी) मधील आणखी एका तरतुदीनुसार राज्याच्या वित्त आयोगाच्या सूचनांच्या आधारे राज्यातील नगरपालिकांच्या आर्थिक स्त्रोतांना सहाय्यभूत व्हावे अशा पध्दतीने राज्याकडील एकत्रित निधीचा वापर करण्याच्या उपाययोजनां राष्ट्रपतींना सादर करणे हे केंद्रीय वित्त आयोगाचे कर्तव्य आहे. अशाप्रकारे नियोजनात समाविष्ट नसलेल्या नगरपालिकांच्या आर्थिक पूंजीच्या मुद्याकडेही राज्य वित्त आयोगाने लक्ष द्यावयाचे आहे. ही सुधारणा अतिशय महत्त्वाची असून त्याचे दूरगामी परिणाम आहेत.

**श्री. प्रशांत पिसोळकर**
निवृत्त महानगरपालिका
मुख्य लेखा परिक्षक, मुंबई
आणि प्रमुख सल्लागार,
अ.भा.स्था.स्व.सं. मुंबई

❒❒❒

## “आर्थिक पारदर्शी कारभारासाठी हिशोब दाखवा अभियान !”

सातारा येथिल पत्रकार प्रा.शिवाजी राऊत माहितीच्या अधिकाराचा वापर करून गाव योजनांची माहिती घेत. माहिती मिळाली, की ते त्या गावात जातात. चावडीच्या कट्ट्यावर बसलेल्यांशी गप्पा मारत. त्यानंतर तुमच्या गावात ही योजना या काळात राबवली होती, त्याला इतका पैसा होता यावर चर्चा करतात. ती माहिती ऐकून गावातील लोक आश्चर्यचकित होतात. ही योजना आमच्या गावात राबवलीच गेली नाही की, असे गावातील लोक म्हणतात. तेव्हा तुम्ही तुमचे काय ते बघा ! मला त्याची माहिती मिळाली, त्याची एक प्रत मी तुम्हाला देतो, असे म्हणून निघून जातात. या माहितीचा गावात परिणाम होतो. गावकरी त्याची जाहीर चौकशी सुरू करताना दिसतात

त्यातून महिला ‘राजसत्ता आंदोलनाने’ हिशोब दाखवा अभियान सुरू केले. ग्रामपंचायतीचा आर्थिक पारदर्शी कारभारासंबंधीचा शासकीय आदेशाची प्रत हाती मिळाली. त्यामुळे प्रत्येक कुटुंबाला जमा खर्च देणे बंधनकारक झाले.

*(**सौजन्य** : वरील मजकूर महिला राजसत्ता आंदोलन प्रकाशित राजसत्तेतल्या कारभारणी या विशेषंकातील आहे.)*

## 'शहरनामा'

# मालेगाव मधील विकासप्रश्नांचा ताणा-बाणा नगरसेवकांसमोरील आव्हाने व संधी

''पॉवरलूम सिटी - महाराष्ट्राचे मँचेस्टर'' ही मालेगावची अनेकांना परिचित असणारी ओळख आहे. त्याचबरोबर धार्मिक दृष्ट्या 'संवेदनशील' आणि भारतातील प्रमुख मुस्लिम-बहुल शहरांपैकी एक ही देखील मालेगावची बाहेरच्या जगातील एक प्रतिमा आहे. २००६ साली या शहरात बॉम्बस्फोटामुळे ही प्रतिमा अधिक गडद झालेली आहे, किंबहुना मालेगाव या शहराचा उल्लेख झाल्यावर अनेकांच्या मनात प्रामुख्याने हीच प्रतिमा येते. मालेगाव शहरात फिरताना, तेथील नागरिकांशी संवाद करताना या शहराची इतर अनेक वैशिष्ट्ये लक्षात येतात. या शहरातील नगरसेविकांना काम करताना कोणत्या आव्हानांना सामोरे जावे लागत असेल, आणि शहराच्या विकासात त्यांना कुठे-कुठे योगदान देण्याची संधी आहे, हे समजून घेण्यासाठी या वैशिष्ट्यांची ओळख करून घ्यायला हवी.

मालेगाव हे शहर नासिक या जिल्ह्याच्या ठिकाणापासून केवळ अड़ीच तासाच्या अंतरावर आहे, शिवाय मुंबई-आग्रा महामार्ग या शहराला लागून जातो. गिरणा आणि मोसम या दोन नद्यांच्या संगमावर मालेगाव वसलेले आहे. यातील मोसम ही नदी शहरातून दक्षिणोत्तर दिशेने वहाते, आणि शहराच्या दक्षिण टोकाशी तिचा संगम (सह्याद्रीच्या डोंगर रांगामधून उगम पावणाऱ्या) गिरणा नदीशी होतो. मोसम नदी ही खरे तर शहराची भौगोलिक विभाजनरेखा पण; २००६ साली झालेल्या बॉम्बस्फोटानंतर या भौगोलिक विभाजन रेखेचे 'धार्मिक विभाजन रेखेत' रूपांतर झाल्याचे दिसते. नदीच्या ''पश्चिमेकडील'' भाग हिंदू बहुल वस्तीचा, तर 'पूर्वेकडील' भाग मुस्लिम बहुल वस्तीचा अशी ही विभागणी झालेली दिसते. २००६ पूर्वी दोन्ही भागांमध्ये अनेक हिंदु मुस्लिम कुटुंबे एकत्रितपणे रहात होती. मंदिर आणि मशीद शेजारी-शेजारी असणारी किल्ला भागातील वस्ती हे त्याचे ठळक उदाहरण होते. आजही या भागात तसेच इतर भागांमधेही हिंदू आणि मुस्लिम समाजाची कुटुंबे एकोप्याने रहात असली तरी त्यांची संख्या कमी झाल्याचे सांगितले जाते. शहरात धार्मिक सलोख्याचे वातावरण निर्माण करण्यासाठी लोकशाही मार्गाने प्रयत्न करणाऱ्या पुरोगामी गटांच्या मते राजकीय आणि आर्थिक हितसंबंधांपोटी दोन्ही धर्मीयांमध्ये कोणत्या ना कोणत्या निमित्ताने भांडवल करून असुरक्षिततेचे वातावरण पसरवण्याचे प्रयत्न सातत्याने केले जातात. भारत-पाकिस्तानमध्ये एक मॅच झाली की आमचे अनेक महिन्यांचे प्रयत्न एका दिवसात पुसले जातात, हे या गटांमधील काही कार्यकर्त्यांनी काढलेले उद्‌गार पुरेसे बोलके आहेत. मालेगाव शहराच्या राजकारणातही या परिस्थितीचे प्रतिबिंब अपरिहार्यपणे पडलेले दिसते. शहरात विकासाचे अनेक गंभीर प्रश्न असूनही मालेगाव महानगरपालिकेच्या निवडणुका मात्र धार्मिक मुद्यांच्या आधारेच लढवल्या जातात. परिणामी मालेगावमधील सार्वजनिक आरोग्य, शिक्षण, आर्थिक विकास हे मुद्दे वर्षानुवर्षे दुर्लक्षित राहिले आहेत.

आजमितीस या शहराची लोकसंख्या साडेसात लाखाच्या घरात असली, तरी शहराचे क्षेत्रफळ कमी असल्याने लोकवस्ती अतिशय दाटी-वाटीची आहे. यातील ७०% लोकवस्ती झोपडपट्ट्यांमधून रहाते, साहजिकच झोपडपट्ट्यांची संख्याही मोठी (२००६ च्या शहरविकास - आराखड्यानुसार अधिकृत ३४ व अनधिकृत ९७) आहे, आणि यातील बहुसंख्य झोपडपट्ट्या शहराच्या पूर्व भागात आहेत. या वस्त्यांमध्ये पाणी, कचरा, सांडपाणी व मलनिःसारण या प्राथमिक सार्वजनिक सुविधांची दुरावस्था शब्दांनी वर्णन करण्यापलिकडची आहे. दोन वर्षांपूर्वी शहराची हद्दवाढ झाल्यामुळे अनेक वर्षे शहराचा भाग असूनही शहराच्या हद्दीबाहेर असलेले भाग, तसेच ग्रामपंचायत व पालिका या दोन्हींच्या क्षेत्रात नसलेला त्रिशंकू अवस्थेतला भाग शहराच्या हद्दीमध्ये आले आहेत. परंतु या भागांमध्ये आजही प्राथमिक सुविधांची दुरवस्था असल्याची खंत या भागातील नागरिक व्यक्त करतात.

वास्तविक पहाता, मालेगाव शहरातील स्त्री-पुरूष अत्यंत मेहनती आहेत. हरहुन्नरी कारागीर तंत्रज्ञांचे शहर अशीही मालेगावची भोवतालच्या परिसरात ओळख आहे. अत्यंत थोड्या भांडवलात इतरत्र टाकून दिलेले पॉवरलूम चालू करणे, चामड्यापासून प्लास्टिक-पाईपपर्यंत अनेकविध वस्तू बनविणे, अत्यंत थोड्या साधनांमधे बॉलिवुड मधील खास सिनेमे तयार करणे ही मालेगावची खासियत आहे. पॉवरलूम आणि त्यावर

आधारित कापड-उद्योग हा या शहराच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. मालेगावमध्ये आजमितीला जवळ-जवळ सव्वा लाख (कदाचित त्यापेक्षाही जास्त) पॉवरलूम आहेत. त्यामुळे मालेगावच्या लोकसंख्येपैकी निम्म्यापेक्षा जास्त कुटुंबे पॉवरलूम-धारक तरी असतात, किंवा पॉवरलूम मजूर तरी, असे म्हटले तर अतिशयोक्ती होऊ नये. १० x १० ची कमालीच्या दाटी-वाटीने कशी-बशी वसलेली जेमतेम एका खोलीची घरे आणि त्याच्या वर जागा मिळाल्यास पुढे-मागे (लोडशेडिंग नसल्यास) अक्षरशः अहोरात्र खडखडणारे पॉवरलूम्स हे चित्र मालेगावच्या वस्त्या-वस्त्यांमधून फिरताना बघायला मिळते. मजूर लावणे न परवडल्याने घरातल्याच सर्वांच्या (लहान मुलांसकट) मदतीने पॉवरलूम चालवणारी मुस्लिम - दलित कुटुंबे आणि स्वस्तातला (अर्थातच नोंदणी न झालेला) पॉवरलूम घेणेही न परवडल्याने अत्यल्प मजुरीमधे राबणारे मजूर या वस्त्यांमधून राहतात. पॉवरलूम मजूर म्हणून काम करणाऱ्यांमधे स्त्रियांची संख्या मोठी असते आणि बहुतेक वेळा या स्त्रिया कुटुंबाच्या पालनपोषणाची जबाबदारी एकहाती निभावत असतात. सार्वजनिक सुविधांचा अभाव आणि पॉवरलूमचा आवाज, कापसाचे वातावरणात भरून राहिलेले तंतू, अंधाऱ्या वातावरणात तासनतास काम करावे लागल्याने पाठ, बोटे, डोळे यावर येणारा प्रचंड ताण या सर्वांमुळे या वस्त्यांमध्ये आरोग्याचे प्रश्न अतिशय गंभीर आहेत.

पॉवरलूमशी जोडून असलेला महत्ताचा उद्योग म्हणजे सूत-खरेदी विक्री, आणि कापड खरेदी विक्री. आधी उल्लेख केल्याप्रमाणे या व्यवसायात हिंदू - त्यातही मारवाडी व जैन कुटुंबांनी जम बसवला आहे. या मोठ्या कापड दुकानदरांकडून लुंगी (ज्याला मालेगावमध्ये सफेद या नावाने ओळखले जाते), साड्या, टॉवेल आणि इतर कपडे घाऊक प्रमाणावर घेऊन त्याची किरकोळ भावाने विक्री करणे यातूनही अनेक कुटुंबे रोजगार मिळवतात. पॉवरलूम व कापड उद्योगाच्या या परस्परावलंबी स्वरूपामुळे हिंदू व मुस्लिम कुटुंबांना खरे म्हणजे एकमेकांशी फार काळ वैर धरणे परवडतच नाही. अनेकदा 'धार्मिक' ताण-तणावांच्या मागे मालक व मजूर यांच्यातील आर्थिक हितसंबंध (उदा. आर्थिक ताण-तणाव, मालक वर्गाने कापडाचे भाव पाडणे, परिणामी सुताच्या किंमतीवर आणि त्यासाठी मिळणाऱ्या मोबदल्यावर विपरित परिणाम होणे) जबाबदार असतात, असा मालेगावकरांचा अनुभव आहे.

या उद्योगांखेरीज मालेगाव परिसरात पिढ्यानपिढ्यां बागायती शेती करणाऱ्या हिंदू कुटुंबाचा लहानसा वर्गही शहरात आहे. मालेगाव महानगरपालिकेचे आणि तालुक्याचे ठिकाण असल्याने, तसेच (२००६ च्या बॉम्बस्फोटानंतर) मालेगावात जिल्हा न्यायालय आणि रूग्णालयही असल्याने सरकारी कार्यालयांमध्ये आणि वकिली, वैद्यकीय अशा व्यवसायांमध्ये काम करणाऱ्यांची संख्याही लक्षणीय आहे.

या सर्व आर्थिक व्यवहारांच्या पलिकडे मालेगावात आणि मालेगाव परिसरात उद्योग-धंद्यांची वाढ होऊ शकलेली नाही. वास्तविक पहाता, मालेगावला एमआयडीसी (ड वर्ग) आहे, परंतु पायाभूत सुविधांचा विकास न झाल्याने या औद्योगिक वसाहतीमधील बहुतांश प्लॉट पडून आहेत. मालेगावमधील पॉवरमधून उद्योगाच्या आधारे मालेगाव परिसरात टेक्सस्टाईल पार्क उभारण्यासाठी शहरातील मुस्लिम तसेच हिंदू उद्योजकांनी केलेल्या पाठपुराव्याला सिंचन विभागाकडून हिरवा कंदिल मिळालेली नाही. शिवाय, मालेगावच्या जातीय प्रतिमेमुळे बाहेरचे उद्योजक व गुंतवणूकदार मालेगाव व परिसरात गुंतवणूक करू इच्छित नाहीत. ही काही उद्योजकांनी व्यक्त केलेली खंत पुरेशी बोलकी आहे. दर्जेदार नागरी सेवा आणि उद्योगधंद्यांच्या विकासाला आवश्यक पायाभूत सुविधांचा विकास, या मालेगावच्या प्रमुख गरजा असताना, राज्यशासनाकडून मात्र 'धार्मिक अशांतता' हाच मालेगावचा एकमेव प्रश्न असल्याप्रमाणे प्रतिसाद दिला जातो. याबाबतही अनेक नागरीक खेद व्यक्त करतात.

थोडक्यात, अत्यंत कार्यमग्न असूनही, मर्यादित आर्थिक उलाढाल असलेले, आधुनिक औद्योगिक विकास मोठ्या प्रमाणावर न होताही अनेकांना रोजगार पुरवणारे आणि मोठी लोकसंख्या सामाजिक आर्थिक उतरंडीच्या खालच्या पायरीवर असलेले आणि आर्थिक राजकीय कारणांपोटी निर्माण केल्या जाणाऱ्या धार्मिक ताण-तणावांच्या छायेत वावरणारे असे हे वैशिष्ट्यपूर्ण शहर आहे. ही वैशिष्ट्ये समजून घेऊन त्यांना सक्षमपणे प्रतिसाद देण्याची प्राथमिक जबाबदारी अर्थातच मालेगाव महानगर - पालिकेवर आहे.

२००२ मध्ये मालेगाव नगरपालिकेचे ड वर्ग महानगरपालिकेत रूपांतर झाले. या बदलामुळे पालिकेच्या जबाबदाऱ्या वाढल्या आणि अपुरे आर्थिक आणि मनुष्यबळ, दोन वर्षांपूर्वी झालेली हद्दवाढ, धर्माधारित संधीसाधू राजकारणाचा दीर्घकाळ पगडा या सर्वांचा परिपाक म्हणून मालेगाव महानरपालिकेची प्रशासकीय, तांत्रिक आणि आर्थिक क्षमता कमालीची खालावली आहे. या पालिकेत आजमितीस ४० नगरसेविका आहेत. या नगरसेविकांपुढील आव्हाने अनेकपदरी आहेत. शहराच्या प्रश्नांची निगडीत धोरणात्मक मुद्यांवर काम करणे हे सहजसाध्य काम नाही. मात्र, शहराच्या आजवर दुर्लक्षित राहिलेल्या विकास-प्रश्नांवर काम करणे, त्यासाठी शहरातल्या दोन्ही धर्मीय

जागरूक नागरिकांचा सहभाग घेणे, निश्चितच शक्य आहे. किंबहूना असे नागरिक (संख्येने थोडे असले तरी) असणे, ही या शहराची मोठी जमेची बाजू आहे. या नगारिकांच्या मदतीने शहरातील मेहनती स्त्री-पुरूषांना संघटित करणे, त्यांच्यासाठी आरोग्य, बचत, आरोग्य-विमा यासारख्या इतर नगरसेवकांना फारसा रस नसणाऱ्या परंतु लोकांसाठी अतिशय जिव्हाळयाच्या असणाऱ्या विषयांमधील योजना राबवण्याचे प्रयत्न सुरू करणे निश्चितच शक्य आहे. JNNURM अंतर्गत झालेल्या लोकसहभाग कायद्यातील तरतुदींचा आधारही त्यासाठी घेता येईल. मालेगाव महानगरपालिकेच्या कारभारात हे करणेदेखील मोठेच आव्हान असेल, पण हे केल्यास नगरसेविकांना लोकांचा पाठिंबा नक्कीच मिळू शकेल आणि विकासाच्या आजवर दुर्लक्षित राहिलेला अजेंडा पुढे आणण्याच्या दृष्टीने ते पहिले महत्त्वाचे पाऊल असेल.

**सीमा काकडे,**
प्रयास, पुणे

❒❒❒

## वस्तीवस्तीच्या बायाबायांमध्ये....

वस्तीवस्तीच्या बायाबायांमध्ये
एकीची गरज हाय गं
मानसावानी जर जगायचं तर,
आज एकीची गरज हाय गं ।। धृ ।।

आजवरी भीत भीत जगलो आपुन,
घरांच्या भिंतींना दुनिया मानून
इचार करून आता भायेर पडून
अन्यायाला दूर करायला
जागं व्हायाची गरज हाय गं ।। १ ।।

कोणी म्हणेल बाईमाणूस तुम्ही,
तुमच्या हातून काही होणार नाही
तुम्ही गुमान घरी बसत का न्हाई ?
गुमान  न्हाऊन आता भागायचं नाय,
हे बजावून सांगायचं हाय गं ।। २ ।।

कारखान्यात, शेतात,
रस्त्यावरी बायामुलींना त्रास भारी
जिथं तिथं होते गुंडगिरी
बायांची ताकद सारी एक झाली तर,
कुणाची टाप हाय गं ।। ३ ।।

सारख्या कामाला नाही सारखा पगार
महागाईने लय केलंय बेजार
न्हाय बाळंत रजा, न्हाई पाळणाघर
एकीच्या जोरावर सारं हक्क मिळवून
घ्यायचे हाय गं ।। ४ ।।

शहरातल्या बाया आता एक होऊ,
दूरवर नजर मग टाकून पाहू
बहिणींना शेतावरल्या हाक देऊ
शहर खेड्यातल्या बाया झाल्या एक तर,
कुणाची भीती न्हाय गं ।। ५ ।।

एकजूट झाल्यावर धीट होऊ
पुरूषांची लढ्याला साथ घेऊ
लढा पुढे आणि घेऊन जाऊ
समदी ताकद आपली लाऊनशानी,
एकीनं लढाई जिंकायची हाय गं ।। ६ ।।

**- कल्पना जवळीकर**

## 'खुले पान'

# महिला व बालकल्याण समितीविषयी उदासिनता

महिला ही समाजातील दुर्लक्षित व उपेक्षित घटक आहे. त्यामुळे महिलांना समान न्याय व सन्मान मिळवून देण्यासाठी शासन अनेकविध उपायांचा अवलंब करीत असते व विविध शासकीय योजनादेखील सुरू करीत असते. त्याचाच एक भाग म्हणून महाराष्ट्र शासनाने नगरपालिका अधिनियम १९६५ मधील कलम ६२, ६३, व ६५ मध्ये सन १९९२ मध्ये दुरूस्ती केली व या दुरूस्तीमुळे प्रत्येक 'अ' व 'ब' वर्ग नगरपरिषदेने महिला व बाल कल्याण समितीची स्थापना करावी असे बंधन घालण्यात आले.

वास्तविक पहाता, ही समिती स्थापन करणे महानगरपालिकांना बंधनकारक असले तरी सोलापूर महानगरपालिकेमध्ये सन २००९ मध्ये या समितीची स्थापना करण्यात आली. ही स्थापना करण्यासाठी आम्ही १९९२ पासून म्हणजे १७ वर्षे प्रयत्न करीत होतो. परंतु त्याचा उपयोग झाला नाही. शेवटी आंदोलन केल्यानंतर या समितीची स्थापना झाली.

समिती स्थापन न होण्यामागचे कारण म्हणजे महिला व महिलांचे प्रश्न याबाबतची उदासिनता. तसेच या समितीसाठी महानगरपालिकेच्या एकूण अंदाजपत्रकाच्या ५% तरतूद करणे आवश्यक आहे. ही तरतूद करण्याची मानसिकता नसल्यामुळेच ह्या समितीची स्थापना लांबणीवर पडली असे मला वाटते.

कायद्याने जरी ५% तरतूद करावी असे असले तरी त्यापेक्षा कमी केवळ दोन कोटींची तरतूद या समितीसाठी केली जाते. ही दोन कोटींची तरतूद देखील खर्च केली जात नाही. वास्तविक पहाता या समितीच्या सभापतींना व समितीतील सदस्यांना ही तरतूद विविध योजनांसाठी खर्च करण्याचा अधिकार आहे. परंतु सोलापूर महानगरपालिकेच्या अजब कारभाराचा नमुना असा आहे की, सभागृहाने (पुरूषांची) नगरसेवकांची समिती स्थापन करून या निधीचा खर्च कसा करायचा हे अधिकार नगरसेवकांनाच देऊन टाकले आहेत. सभापती व महिला सदस्य या नुसत्याच कठपुतळया प्रमाणे आहेत.

समितीची स्थापना उशीरा झाली. वेळेवर निर्णय घेतले गेले नाही. त्यामुळे सर्व निधी खर्च झाला नाही. शिल्लक रकमा परत सभागृह नेते, महापौर अशा पदाधिकाऱ्यांनी प्रशासनाच्या मदतीने दुसऱ्याच कामासाठी वळत्या केल्या.

महिला आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी नसल्यामुळे त्यांना जीवनात कठीण प्रसंगांना सामोरे जावे लागते. जर त्या आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनल्या तर त्यांचे व कुटुंबाचे अनेक प्रश्न मार्गी लागू शकतात. या दृष्टीनेच महिला व बाल कल्याण समितीमार्फत महिलांना विविध व्यवसायांचे प्रशिक्षण दिले जाते. उदा. ब्युटी पार्लरचे प्रशिक्षण, हस्तकला, मेंदी काढणे, व्यवसाय प्रशिक्षण इ. परंतु महिलांनी या प्रशिक्षणातून विविध वस्तूंचे उत्पादन केल्यानंतर त्या वस्तूंच्या विक्रीसाठी महिलांना अनेकविध समस्यांना तोंड द्यावे लागते. या समितीमार्फत महिला बचत गट व महिला मंडळांच्या विविध उत्पादित वस्तुंच्या विक्रीसाठी विक्री केंद्र उभारणे किंवा महानगरपालिकेचे जे गाळे असतात ते उपलब्ध करून द्यावेत व अशी विक्री केंद्रे स्वयंसेवी संस्थामार्फत चालविण्यात यावीत अशी अनेक योजना आहेत. पण प्रत्यक्षात त्यांची अंमलबजावणी होताना दिसत नाही.

महिलांना स्वतःचा अगर सहकारी तत्त्वावर व्यवसाय करता यावा यासाठी त्या त्या क्षेत्रातील यशस्वी व तज्ञ व्यक्तींच्या मार्गदर्शनाचा लाभ देणे, महिलांसाठी विविध प्रबोधनात्मक स्पर्धा घेणे, शालेय विद्यार्थ्यांसाठी प्राणायाम, कराटे, कुंग फू, योगा प्रशिक्षण, महिला व मुलींसाठी आरोग्य तपासणी शिबीरे भरवणे, सार्वजनिक ठिकाणी महिलांसाठी प्रसाधनगृह बांधणे वगैरे अशा अनेक योजना राबविल्या जाऊ शकतात.

शासनाचा उद्देश कोणतीही योजना सुरू करीत असताना चांगलाच असतो. परंतु त्याची अंमलबजावणी करणारे अधिकारी व लोकप्रतिनिधी यांच्या उदासिनतेमुळे तसेच अनिच्छेमुळे सदरच्या योजनांचा उद्देश सफल होत नाही. ज्या महिला लोकप्रतिनिधी समितीच्या सभापती होतात किंवा सदस्य म्हणून काम करतात त्यांना देखील या कामाचे महत्व व व्याप्ती लक्षात येत नाही. शिक्षणाचा अभाव, पुरूषी मानसिकता, राजकारण इ. किंवा अशा अनेकविध कारणांमुळे महिला व बाल कल्याण समितीच्या कार्याला खिळ बसताना दिसते.

**श्रीमती मोहिनी पत्की**
नगरसेविका
सोलापूर महानगरपालिका

**महिला व बालविकास**
**महानगरपालिका व नगरपालिका / नगरपरिषदा /**
**नगरपंचायती यामध्ये महिला व बालकल्याण**
**समितीने राबवावयाच्या योजना**

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
शासन निर्णय क्रमांक संकीर्ण २००५ / प्र. क्र. २५५ / ०५ / नवि - २०
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक ८ नोव्हेंबर, २०१०

वाचा : १) नगर विकास विभाग, शासन पत्र क्र. जीईएन - १०९३ / ३२५ / प्र. क्र. २४ / नवि - ३२, दि. १७ एप्रिल, १९९३.
२) नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र. जीईएन - १०९३ / ११९८ / नवि - १४, दिनांक १४ जुलै, १९९३.
३) नगरविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण २००५ / प्र. क्र. १५६ / ०५ / नवि - २०, दिनांक ३० डिसेंबर, २००६

**प्रस्तावना**

शासनाने महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम, १९६५ मधील कलम ६२, ६३, व ६५ मध्ये सन १९९२ मध्ये दुरूस्ती करण्यात आली. या दुरूस्तीमुळे प्रत्येक ''अ'' व ''ब'' वर्ग नगरपरिषदेने महिला व बालकल्याण समितीची स्थापना करावी, असे बंधन घालण्यात आले. तसेच ''क'' वर्ग नगरपरिषदांना या समितीची स्थापना करता येईल, अशी तरतूद कलम ६५ मध्ये करण्यात आली. या समितीने करावयाची कामे क्रमांक जीईएन / ३२५ / प्र. क्र. २४ / ३२, दिनांक १७ एप्रिल १९९३ अन्वये परिपत्रकात प्रस्तुत करण्यात आली आहेत, सदर परिपत्रकीय पत्रातील कामाची यादी सूचक असून परिपूर्ण आहे असे म्हणता येणार नाही.त्यामध्ये कालमानानुसार बदललेली परिस्थिती, स्थानिक गरजा लक्षात घेवून यादीमध्ये बदल करणे, वाढ करणे, आवश्यक ठरणार आहे आणि महिला व बालके यांच्या कल्याणासाठी योजना राबविणे हे मुख्य ध्येय व धोरण लक्षात घेऊन यादीत आवश्यक फेरबदल करण्यास नगरपालिका सक्षम असतील असे दिनांक १४ जुलै १९९३ च्या शासन निर्णयान्वये स्पष्ट करण्यात आले आहे. महिला व बालकल्याण कार्यक्रमामध्ये बदलत्या परिस्थितीनुसार बऱ्याच योजना / कार्यक्रमांमध्ये बदल / सुधारणा करणे आवश्यक आहे. त्यानुसार संकीर्ण २००५ / प्र. क्र. १५६ / ०५ / नवि - २० दिनांक ३० डिसेंबर, २००६ या शासन निर्णयामध्ये आवश्यक त्या योजना / कार्यक्रमांमध्ये बदल / सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

राज्यातील महानगरपालिका, नगरपरिषद / नगरपंचायती यामध्ये महिलांच्या विविध योजना राबविण्याकरिता महिला व बालकल्याण समिती गठीत करण्यात आली आहे. सदर समितीने राबवावयाचे कार्यक्रम संदर्भाधीन पत्र व शासन निर्णयान्वये सर्व महानगरपालिका / नगरपरिषद / नगरपंचायती यांना कळविण्यात आले होते. तथापि, बदलत्या परिस्थतीनुसार बऱ्याच योजना / कार्यक्रम कालबाह्य झाल्यामुळे त्यामध्ये बदल / सुधारणा करणे आवश्यक आहे. तसेच बहुतेक महानगरपालिका / नगरपरिषदा / नगरपंचायती मध्ये अशा योजनांसाठी अत्यल्प तरतुद असल्याने महिलांच्या योजनांची योग्य रीतीने अंमलबजावणी होत नाही. या सर्व बाबी लक्षात घेऊन महिलांना सर्व क्षेत्रात सक्षम करण्यासाठी महानगरपालिका नगरपरिषद / नगरपंचायती क्षेत्रात महिला व बालकल्याण समित्यांनी महिला व बालकल्याण यासाठी राखीव ५% तरतूदीतून खालील योजना राबविण्याबाबत शासनाचे आदेश आहेत.

**शासन निर्णय :**

महिला व बालकल्याण यासाठी राखीव असलेल्या ५% तरतुदीतून खालील बाबीवर खर्च करण्यात यावा.

१. ज्या ठिकाणी अंगणवाडी इमारती भाड्याने आहेत किंवा अयोग्य सार्वजनिक इमारतीमध्ये भरत आहे. त्यासाठी अंगणवाडी केंद्राची इमारत बांधून यामध्ये (ICDS) योजनेसाठी रू. १/- दरमहा नाममात्र भाड्यांवर उपलब्ध करून देणे.

२. अंगणवाडी केंद्रातील मुलांकरिता आवश्यक शैक्षणिक / शैक्षणिक साहित्य खरेदी करणे.

३. पिण्याच्या पाण्याची व्यवस्था निर्माण करणे व शौचालय बांधकाम करणे.

४. मुलांकरिता पोषक आहार पुरविणे.

५. ०-३ वर्षाच्या मुलांकरिता (Creche) किंवा (Day Care Centre) बांधणे व क्रियान्वित करणे तसेच पाळणाघर चालविणाऱ्या अशासकीय संस्थांना अर्थसहाय्य करणे.

६. गरोदर महिलांसाठी तसेच शालेय विद्यार्थी व अंगणवाडी विद्यार्थी यांची वैद्यकीय तपासणी व औषधोपचार करणे.

७. मुलींकरीता शिष्यवृत्ती योजना राबविणे.

८. महिलांसाठी प्रसृतीगृह बांधणे अथवा श्रेणीवाढ करणे अथवा विस्तारीकरण करणे.

९. मुलींना / महिलांना व्यावसायिक प्रशिक्षण देणे.

१०. काम करणाऱ्या महिलांसाठी वसतिगृह बांधणे.

११. शिकणाऱ्या मुलींसाठी वसतिगृह बांधणे.

१२. पोलीओग्रस्त किंवा अपंगमुलांना (Prosthetic/ aids पुरविणे.

१३. महिलांसाठी समुपदेशक केंद्र चालविणे, (helpline) चालविणे, विधी सल्ला केंद्र चालविणे इ.

१४. (BPL) खालील मुलींची शाळा गळतीचे प्रमाणे थांबविण्याबाबत प्रोत्साहनपर दैनिक उपस्थितीत भत्ता देणे.

१५. मुलींच्या सार्वजनिक शाळेत विविध क्रीडा सुविधा निर्माण करणे.

शासनाने मान्य केलेल्या वरील योजना तसेच इतर उपयुक्त योजना तयार करून राबविण्याचे पूर्ण अधिकार महानगरपालिकाच्या आयुक्तांना राहतील. तथापि नगरपरिषद / नगरपंचायती यांचे मुख्याधिकाऱ्यांना वरील शासनमान्य योजनांपैकी फक्त रू. १० लाख प्रति योजना या अर्थिक मर्यादेपर्यंत योजनेस मान्यता देणे व योजना राबविण्याचे अधिकार राहतील. रू. १० लाखाच्या वर एखाद्या योजनेची आर्थिक मर्यादा येत असल्यास त्यासाठी आयुक्त, महिला व बालविकास पुणे याची मान्यता घेण्यात यावी. मान्य योजनेपैकी कोणतीही रू. १० लाखाच्या आतील योजना राबविण्याचे अधिकार मुख्याधिकारी, नगरपरिषदा / नगरपंचायती यांना राहतील. मात्र वरील मान्य केलेल्या योजनांव्यतिरिक्त एखादी नवीन योजना घ्यावयाची असेल किंवा विद्यमान योजनेच्या नियम व अटीमध्यें बदल करावयाचे असल्यास त्यांनी आयुक्त, महिला व बालविकास, पुणे यांची तांत्रिक मान्यता घ्यावी. योजनेच्या अंमलबजावणी व नियंत्रणासाठी आयुक्त, महिला व बालविकास, पुणे हे नियंत्रण अधिकारी असतील व जिल्हास्तरावर जिल्हा व महिला बालविकास अधिकारी नियंत्रण अधिकारी म्हणून काम पाहतील.

आयुक्त, महानगरपालिका, मुख्याधिकारी, नगरपालिका / नगरपंचायती यांनी प्रत्येक वर्षाच्या सुरवातीपासूनच योजना राबविण्याचा कार्यक्रम तयार करण्याची दक्षता घ्यावी व या योजनांवर करण्यांत येणाऱ्या खर्चाची माहिती महिला व बाल विकास विभागास सादर करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

**(र.शि.घाटगे)**
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

- सचिव, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
- आयुक्त तथा संचालक नगरपालिका प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई - २५
- विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, नगरपालिका प्रशासन (सर्व)
- जिल्हाधिकारी (सर्व)
- आयुक्त, महानगरपालिका (सर्व)
- मुख्याधिकारी, नगरपरिषद / नगरपंचायती (सर्व)
- विभागातील सर्व सहसचिव / उपसचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
- निवडनस्ती, नवि-२०.

❑❑❑

# ‘तुमचेही मत नोंदवा’

नमस्कार मैत्रिणींनो,

या अंकापासून हे नवीन सदर आपल्या मतांची नोंद घेण्यासाठी सुरू करत आहोत. आमचा अंक आपल्याला कितपत उपयोगी पडत आहे हे उमगण्यासाठीचा हे सदर एक दुवा आहे. त्याचप्रमाणे आपल्या सूचना, अभिप्राय, आम्हाला खूप महत्त्वाचे वाटतात. हा अंक महिला व बालकल्याण समितीवर विशेष भर देणारा आहे. त्या अनुषंगाने काही मुद्दे आम्ही काढले आहेत. आपले त्यावरील मत आम्हाला आवर्जून पत्राद्वारे कळवा.

१) हा अंक तुम्हाला कसा वाटला ?

-----------------------------------------------------------------------------------------------------------

२) तुम्ही जिथे कार्यरत आहात तिथे महिला व बालकल्याण समितीचा निधी नियमित मिळतो का ?

-----------------------------------------------------------------------------------------------------------

३) हा निधी पूर्ण वापरला जातो कि कसा ?

-----------------------------------------------------------------------------------------------------------

४) या निधीतून कोणत्या कोणत्या प्रकारच्या योजना व उपक्रम राबविले जातात ?

-----------------------------------------------------------------------------------------------------------

५) निधी कमी पडल्यास अधिकचा निधी कसा मिळवता ?

-----------------------------------------------------------------------------------------------------------

६) या संबंधीचा शासन निर्णय या अंकात दिला आहे महिला व बालकल्याण समिती अंतर्गत दिलेल्या योजना व्यतिरिक्त कोणत्या योजना असाव्यात असे आपल्याला वाटते ? आपण कोणती नाविन्यपूर्ण विशेष दखल घेणारी योजना राबवली असल्यास ती कोणती ?

-----------------------------------------------------------------------------------------------------------

७) नगरपरिषदांमध्ये म.व.बा.क. समितीला वैधानिक दर्जा आहे. महानगरपालिकांमध्ये ही विषय समिती आहे. महानगरपालिकेतही म.व.बा.क. समितीला वैधानिक दर्जा मिळावा असे वाटते का ? (कारणे)

-----------------------------------------------------------------------------------------------------------

शहरी कारभारणींना सक्षम करण्याचा प्रक्रियेत आम्हीही हातभार लावण्याचा प्रयत्न करत आहोत. तुमचे अनुभव मोलाचे आहेत, कारण तुम्ही स्वतः कारभार करीत आहात. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ५०% महिला आरक्षणाने आपल्याला संधी दिली आहे. त्याचा उपयोग करूया, परस्परांना ताकद देऊयात.

‘एकी न् एक एक, निर्भिड साऱ्या बना ग !

शहरी कारभारणी त सहभागी व्हा, अनुभव लिहा प्रश्न विचारा

आपला अभिप्राय आवर्जून कळवा. संपर्काची नावे व पत्ते अंकामध्ये सुरूवातीला दिली आहेत.

## लोकशाही प्रभावी ठरवणारी चतु:सूत्री

‘लोकांच्या राजकीय व सामाजिक जीवनात क्रांतीकारक बदल, रक्ताचा एकही थेंब न गाळता घडवून आणणे, म्हणजे लोकशाही’

- समाजात श्रेष्ठ - कनिष्ठ असे भेद नसावेत.
- विरोधी राजकीय पक्ष लोकशाहीची संजीवनी होय.
- कायदा आणि राज्यकारभार यांच्यासाठी सर्व समसमान धरले जावेत.
- संसदीय नीतीमत्ता व सारासार विचारांचे काटेकोरपणे पालन व्हावे.

पुणे येथील ‘डिस्ट्रीक्ट लॉ लायब्ररी हॉल’मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी २२ डिसेंबर १९५२साली व्याख्यान दिले होते. त्यात त्यांनी लोकशाहीच्या सर्व उपलब्ध व्याख्यांचा परामर्श घेऊन, स्वत:ची व्याख्या सुस्पष्टपणे सांगितली होती.

*(संदर्भ: डॉ. आंबेडकर चिंतन, केशव मेश्राम, पृष्ठ क्र. २१)*